जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
पुढारी

# विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिनानिमित्त शपथ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचविणे, देशासाठी व दहशतवाद विरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे हा हेतू आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली.

यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, श्रीमती संध्या अडसुळे, अजित चौगुले, डॉ. राजेंद्र रायकर, वसंत एकले आदी उपस्थित होते. डॉ. तानाजी चौगले यांनी सर्वांना शपथ दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
सकाळ

# विद्यापीठात दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिनाची शपथ

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिनी दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव संध्या अडसुळे, अजित चौगुले, डॉ. राजेंद्र रायकर, विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले सुरक्षा अधिकारी वसंत एकले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
लोकमत

# हिंसाचारविरोधी दिनाची शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, संध्या अडसुळे, अजित चौगुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
तरुण भारत

# दहशतवाद, हिंसाचारविरोधी दिनी शिवाजी विद्यापीठात घेतली शपथ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ.तानाजी चौगले यांनी सर्वांना शपथ दिली. दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचविणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे हा हेतू आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, संध्या अडसुळे, अजित चौगुले, डॉ. राजेंद्र रायकर, वसंत एकले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठामध्ये दहशतवाद, हिंसाचारविरोधी शपथ

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात देशाचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनानिमित्त दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यात आला. यावेळी मान्यवरांसह विद्यार्थ्यांनी दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेतली.

दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिन पाळण्यामागे जगात शांतता प्रस्थापित व्हावी आणि अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचविणे, देशासाठी व दहशतवादाविरोधात लढणाऱ्या सैनिकांच्या त्याग व बलिदानाचा सन्मान करणे हा हेतू आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील लॉनमध्ये दहशतवाद व हिंसाचारविरोधी शपथ घेण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन संचालक डॉ. अजितसिंह जाधव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, उपकुलसचिव संध्या अडसुळे, अजित चौगुले, डॉ. राजेंद्र रायकर, सुरक्षा अधिकारी वसंत एकले आदी उपस्थित होते. विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगले यांनी सर्वांना शपथ दिली.

22 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सकाळ'तर्फे आज रंगणार 'गौरवगाथा' सोहळा

## हॉटेल व्यावसायिकांसह भूमिपुत्रांचा गौरव; कॉफीटेबल बुकचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : नोकरी-व्यवसायाच्या निमित्तानं अनेकांनी आपलं गाव सोडलं आणि जगभरातील विविध ठिकाणी जाऊन ही मंडळी आपापल्या क्षेत्रात यशोलौकिकाचे शिलेदार ठरली. काहींनी आपापल्या गावात राहूनच यशाची शिखरं पादाक्रांत केली. त्यातही हॉटेल व्यावसायिकांचे योगदान मोठे आहे. असे सारे भूमिपुत्र उद्या (गुरुवारी) एकवटणार आहेत. निमित्त आहे, 'सकाळ गौरवगाथा' कार्यक्रमाचे. हॉटेल सयाजी येथे सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होईल. यावेळी कॉफीटेबल बुकचे प्रकाशन होईल.



डॉ. डी. टी. शिर्के



विकास पाटील

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अभिनेता विकास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होईल. विविध दूरचित्रवाणी मालिका आणि सिनेमांच्या माध्यमातून भेटणाऱ्या विकास पाटील यांच्याशी संवादाची संधीही यानिमित्ताने मिळणार आहे.

एखादे ध्येय उराशी बाळगून आपलं गाव सोडायचं आणि दुसऱ्या गावात, शहरात जाऊन ध्येयापर्यंत पोचताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

स्थानिक पातळीवर कार्यरत असतानाही आव्हाने असतातच. त्यावर मात करीत या भूमिपुत्रांनी आपापली यशकथा साकारली आहे. या प्रेरणादायी यशकथा नव्या पिढीसमोर याव्यात आणि त्यातून त्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने हा सोहळा होणार आहे.

22 MAY 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातून शिक्षण घेण्यासाठी साडेपाच हजार विद्यार्थ्यांची तयारी

## पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया; बारावीनंतरही प्रवेशाची संधी

कोल्हापूर, ता. २१ : दक्षिण महाराष्ट्राचे ज्ञानकेंद्र असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेशित होऊन शिक्षण घेण्यासाठी ५ हजार ४५५ विद्यार्थ्यांनी तयारी दर्शविली आहे. त्यापैकी ३ हजार ७३७ जणांनी विविध २९ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षाही दिली आहे. बारावीनंतर सात अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया विद्यापीठात सुरू झाली आहे.

एम. एस्सी., रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, वनस्पतीशास्त्र, बायोकेमिस्ट्री, पर्यावरण, अर्थशास्त्र अशा २९ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाने ऑफलाईन ओएमआर शीटवर १३ ते १७ मे दरम्यान प्रवेश परीक्षा घेतली आहे. सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. त्याचा निकाल ३ ते ५ जून दरम्यान निकाल जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध होवून कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर विद्यार्थ्यांना अपॉईंटमेट लेटर जाईल. या विद्यार्थ्यांनी त्यानंतर प्रत्यक्ष प्रवेशाची कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.

बारावीनंतर विविध नऊ अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची संधी आहे. त्यात बी. ए. स्पोर्टस्, फिल्म मेकिंग, बी. कॉम. बँकिंग फायनान्स सर्व्हिसेस ॲण्ड इन्शुरन्स (बीएफएसआय), बी. एस्सी.- एम.एस्सी. नॅनोसायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, बी.एस्सी.- एम. एस्सी. एआय ॲण्ड मशीन लर्निंग, बी. एस्सी.-एम. एस्सी. इकॉनॉमिक्स इंटिग्रेटेड, बीबीए-एमबीए., बी.एस्सी.बी.एड., बीसीए या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत ३१ मेपर्यंत आहे. त्यानंतर गुणवत्ता यादी जाहीर होऊन दहा जूनपर्यंत प्रवेश निश्चितीची मुदत आहे.

**प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन**

विद्यापीठ कॅम्पसमधील प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अशा सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ५ हजार ४५५ हजार विद्यार्थ्यांनी यावर्षी तयारी दर्शविली. प्रवेश प्रक्रियेचे स्वरुप ऑनलाईन आहे. सर्व प्रक्रिया दहा जूनपर्यंत पूर्ण करून १६ जूनपासून अभ्यासक्रमांचे वर्ग सुरू केले जाणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या पी. जी. ॲडमिशन विभागाचे अधीक्षक उमेश भोसले यांनी दिली.

**आकडेवारी दृष्टिक्षेपात**

- पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम-२९
- बारावीनंतरच्या अभ्यासक्रमांची संख्या-९
- यावर्षी प्रवेशासाठी नोंदणी केलेले विद्यार्थी-५४५५
- प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरलेले विद्यार्थी-४३८२
- प्रवेश परीक्षा दिलेले विद्यार्थी- ३७३७

**असेसमेंटसाठी विद्यार्थ्यांना आवाहन**

सर्व पदवी अभ्यासक्रमाबाबत प्रथम वर्ष (भाग एक ) सत्र-दोनसाठी लागू केलेल्या व्हॅल्यू एज्युकेशन कोर्सचा वेलकमिंग डायव्हर्सिटी फॉर बिल्डिंग सोसायटी: डेमोक्रेसी कॉन्स्टिट्यूशन इलेक्शनमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्या विद्यार्थ्यांची दहा गुणांची असलेली असेसमेंट २३ मेपर्यंत पूर्ण करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले.

22 MAY 2025

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात ऑनलाईन, दूरशिक्षण प्रवेश प्रक्रिया सुरू

## डॉ. के. बी. पाटील यांची माहिती

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एमबीए तसेच ऑनलाईन एमबीए, एम.कॉम., आणि एम.एस्सी. (गणित) त्याचबरोबर प्रमाणपत्र अभ्यासक्रम आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. त्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३० जूनपर्यंत असल्याची माहिती प्र. संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

डॉ. पाटील म्हणाले, जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निमशासकीय अथवा खासगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध आहे. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीसाठी प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे, असे आवाहन प्र. संचालक डॉ. पाटील यांनी केले आहे.

### अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये

दुहेरी पदवीची सोय, एकूण १२ दूरशिक्षण अभ्यासक्रम तसेच ३ ऑनलाईन अभ्यासक्रम, २५ हून अधिक दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम, दुर्गम भागासह ८६ अभ्यास केंद्रांची सोय, विद्यार्थ्यांना सेट व नेट तसेच इतर स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन, नोकरीविषयक आणि स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन, दर्जेदार स्वयंअध्ययन साहित्य, अभ्यास केंद्रामध्ये संपर्क सत्राचे आयोजन.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
तरुण भारत

# दूरशिक्षणसह ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या प्रवेशाला प्रारंभ

▪ ३० जूनपर्यंत अर्ज भरता येणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ झाला. दूरशिक्षण अंतर्गत बी. ए., बी. कॉम., एम. ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम. कॉम., एम. एस्सी (गणित) एम. बी. ए. तसेच ऑनलाईन एम. बी. ए., एम. कॉम. आणि एम. एस. सी. (गणित) त्याचबरोबर प्रमाणपत्र अभ्यासक्रम आदी अभ्यासक्रमांना ३० जून २०२५ पर्यंत प्रवेश घेता येणार आहेत, अशी माहिती संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

डॉ. पाटील म्हणाले की, जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निमशासकीय अथवा खाजगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खाजगी कंपन्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचारी आदींनी प्रवेश घ्यावा. शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध असून http//sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/login या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीसाठी प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे. अधिक माहितीसाठी शिवाजी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
लोकमत

# दूरशिक्षणची प्रवेशप्रक्रिया सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित), एम.बी.ए. तसेच ऑनलाइन एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) त्याचबरोबर प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेस सुरुवात झाली. विद्यार्थ्यांना ३० जूनपर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती प्र.संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी दिली.

डॉ.पाटील म्हणाले, जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशा इच्छुकांनी दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी आहे. www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर जाहिरात उपलब्ध करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या १८२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. त्याचबरोबर बुधवारी परीक्षा पूर्ण झालेल्या १० अभ्यासक्रमांचे निकाल बुधवारी जाहीर झाले, तर एकूण १८२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. दिवसभरात विविध ६२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने पार पडल्या. या परीक्षांसाठी ६२ हजार ४६० विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025
पुढारी

शिवाजी विद्यापीठातून

# उन्हाळी सत्र परीक्षेला ३२,२५७ विद्यार्थी उपस्थित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च - एप्रिल उन्हाळी सत्रातील परीक्षेला ३२ हजार २५७ विद्यार्थी उपस्थित होते. आजअखेर १७२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. मंगळवारी बीए., बीएस्सी., डिप्लोमा इन शेरीकल्चर, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन रूरल डेव्हलपमेंट, एम.लिब, फार्मसी, बीआयडी, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर आदी २८ अभ्यासक्रमांच्या परीक्षा १४ केंद्रांवर झाल्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्या शाखेंतर्गत असणाऱ्या सर्व पदवी अभ्यासक्रमाबाबत प्रथम वर्ष (भाग एक) सत्र-२ साठी लागू करण्यात आलेल्या व्हॅल्यू एज्युकेशन कोर्सचा वेलकमिंग डायव्हरसिटी फॉर बिल्डिंग सोसायटी : डेमोक्रसी कन्स्टिट्यूशन इलेक्शनमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी 'बीएएलएमएस'वर रजिस्ट्रेशन केले आहे, त्या विद्यार्थ्यांची १० गुणांची असलेली क्यूज फॉर इंटरनल असेसमेंट पूर्ण करण्यासाठी २३ मेपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 MAY 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २०२४-२५ उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर परीक्षा सुरू आहेत. बुधवारी बीए., बीएस्सी., डिप्लोमा इन सेरिकल्चर, पोस्ट ग्रॅच्युएट डिप्लोमा इन सेरीकल्चर, पोस्ट ग्रॅच्युएट डिप्लोमा इन रूरल डेव्हलपमेंट, एम. लिप. फार्मा डी. बी. आय. डी., बी आर्किटेक्चर, पीजी डिप्लोमा इन ह्युमन राईट अॅण्ड व्हॅल्युज इन एज्युकेशन, पी. जी. डिप्लोमा इन गांधी स्टडीज अशा ६२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा एकूण १८७ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडल्या. ६२ हजार ४६० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.